MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# Vidya warta

International Multilingual Research Journal

Editor
Dr.Bapu G.Gholap

260

17

# मराठवाडयातील प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता-एक अभ्यास

डॉ. पी. ई. कान्हेरे
सी. पी. अध्यापक महाविद्यालय,जालना

डॉ. बी. आर. गायकवाड
अर्थशास्त्र विभागप्रमुख,
अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना.

**********

**प्रस्तावना :-**

प्राथमिक शिक्षण हा सर्व शिक्षणाचा पाया असल्याने आजमितीस प्राथमिक शिक्षणाचा विषय हा केवळ राज्यापुरता मर्यादित न राहता तो केंद्र व राज्य शासनाची संयुक्त जबाबदारी बनलेला आहे. ज्या देशामध्ये लोकांना प्राथमिक शिक्षणाचा लाभ मिळाला आहे. त्या देशामध्ये शेती, आरोग्य, लोकसंख्या नियंत्रण आणि उद्योग क्षेत्रात अधिक प्रगती झाली आहे. मुक्त अर्थव्यवस्थेच्या या युगात शेती आणि उद्योग या दोन क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करता येईल असे मनुष्यबळ तयार करण्याच्या दृष्टीने शिक्षणाचे महत्व आणखीच वाढले आहे. प्राथमिक शिक्षण हे व्यक्तीचे भावी जीवन वृध्दींगत व विकसीत करण्याचे साधन आहे. प्राथमिक शिक्षणामुळे व्यक्तीच्या भावी जीवन विकासाचे बिजारोपन होते व त्यातून सहकार भावना, विचार स्वातंत्र्य, चिकित्सक वृत्ती व राष्ट्रप्रेम या सर्व सामाजिक गुणांचा विकास होत जातो. त्याच बरोबर शिक्षणामुळे कुशल कामगार तयार होत असतात. शिक्षण हीं बालकांच्या जन्मापासून ते मृत्युपर्यंत चालणारी एक अखंड प्रक्रिया आहे. ती केवळ शाळा, महाविद्यालयापर्यंत मर्यादित अथवा विशिष्ट स्थितीपर्यंत सिमित नसते. शाळे प्रमाणेच मनुष्य घरी, समाजात, जीवनात सर्वत्र शिकत असतो. मानवी जीवनाचा सर्वांगिण विकास शिक्षणामुळेच होत असतो. मानवाला अन्न, वस्त्र आणि निवारा या खालोखाल आता शिक्षण ही मुलभूत गरज बनली आहे. शिक्षणामुळे माणसातील सुप्त क्षमतांचा विकास होतो. मानवाच्या आज पर्यंतच्या वैज्ञानिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकिय इत्यादी सर्व प्रकारच्या विकासामध्ये शिक्षण प्रक्रियेचा खूप मोलाचा वाटा आहे. शिक्षणामुळे आज आपण संपूर्ण जगाशी जोडले गेलो आहोत. त्यामुळे शिक्षणाची सर्व दरवाजे सर्वांसाठी खूली झाली आहेत. मानवाने शिक्षणाच्या जोरावर आकाशात भरारी घेतली. समुद्रात माशाप्रमाणे वावरू लागला हे सर्व शिक्षणामुळे शक्य झाले आहे.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतीय राज्यघटनेच्या ४५ व्या कलमामध्ये सर्व बालकांना त्यांच्या वयाची १४ वर्ष पूर्ण होई पर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची तरतूद करण्यात आली तरी देखील सन २००० पर्यंत शासनाच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाची संकल्पना पूर्णत्वास गेलेली नाही. मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणासाठी सन २००२ मध्ये केंद्र शासनाने सर्व शिक्षा अभियान योजनेची अंमलबजावणी केलेली आहे. या योजनेमुळे प्राथमिक शिक्षणातील मुलांची पटनोंदणी, मुलांची शिक्षणातील गळती, शैक्षणिक गुणवत्ता, पायाभूत भौतिक सोयी सुविधा इत्यादी घटकामध्ये अमुलाग्र बदल झालेला आहे.

सन २०१० पर्यंत सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण होईल अशी अपेक्षा शासनाने व्यक्त केलेली होती पण ती पूर्ण झालेली नाही. भारतातील एक अग्रगण्य राज्य म्हणुन महाराष्ट्र राज्याची ओळख आहे. महाराष्ट्रात नागपूर, अमरावती, औरंगाबाद, नाशिक, पुणे व मुंबई असे एकूण सहा प्रशासकिय विभाग आहेत. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात प्रादेशिक असमतोल आढळतो. हे विविध अभ्यास गट व संशोधनाअंती सिध्द झाले आहे. मराठवाडा हा विभाग इतर विभागाच्या तुलनेने मागासलेला आहे. शिक्षणाच्या संदर्भात हा असमतोल प्रामुख्याने जाणवतो.

दर्जेदार प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी शासनाकडून सर्व शिक्षा अभियान योजना राबविली जात आहे. तरीही मराठवाडा विभागात शाळाबाहय मुलांचे प्रमाण, शिक्षणातील गळती, शैक्षणिक गुणवत्तेचा अभाव तर काही ठिकाणी पायाभूत सोयी सुविधांचा अभाव असल्याचे दिसून येते. या पार्श्वभूमीचा विचार करुन सर्व शिक्षा अभियानामुळे मराठवाडयातील प्राथमिक शिक्षणातील पायाभूत सुविधा व गुणवत्ता यामध्ये नेमका काय बदल झाला आहे हे अभ्यासण्याचा प्रयत्न सदरील अभ्यासात करण्यात आला आहे.

**उद्दिष्टे :-**

१. मराठवाडा विभागात सर्व शिक्षा अभियान योजनेमुळे निर्माण झालेल्या पायाभूत सुविधांचा अभ्यास करणे.

२. मराठवाडा विभागात सर्व शिक्षा अभियान योजनेमुळे प्राथमिक शिक्षणाच्या गुणवत्तेचा अभ्यास करणे.

३. मराठवाडा विभागात प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी उपाय योजना सुचविणे.

अभियानामुळे १८१ (९०.५०%) शाळात शाळाबाहय मुलींचे प्रमाण कमी झाल्याचे दिसून आले तर १९ (९.५०%) शाळात शाळाबाहय मुलींचे प्रमाण कमी झाले नसल्याचे दिसून आले.

१०) मराठवाडा विभागातील नमुना सर्वेक्षणासाठी निवडलेल्या एकूण शाळांतील १५९६ शिक्षकांपैकी १३१४ (८२.३३%) शिक्षकांनी शिक्षक-प्रशिक्षण पूर्ण केलेले दिसून आले. तर २८२ (१७.६७%) शिक्षकांनी अद्याप शिक्षक-प्रशिक्षण घेतले नसल्याचे निदर्शनास आले.

११) मराठवाडा विभागाच्या एकूण नमुना शाळेतील मराठी विषयासंदर्भात विभक्ती प्रकार ओळखा याविषयी विद्यार्थी मूल्यमापनात असे आढळून आले की, एकूण नमुना मुलांपैकी सरासरी ३२.५०% मुलांनी विभक्ती प्रकार बरोबर ओळखला तर सरासरी ६७.५०% मुलांनी विभक्ती प्रकार चुकीचा ओळखला. त्याचप्रमाणे एकूण नमुना मुलींपैकी सरासरी ३३.७५% मुलींनी विभक्ती प्रकार बरोबर ओळखला तर सरासरी ६६.२५% मुलींनी विभक्ती प्रकार चुकीचा ओळखल्याचे दिसून आले.

१२) मराठी विषयातील क्रियाविशेषण अव्ययांचा प्रकार ओळखा असा प्रश्न विचारण्यात आला असता एकूण नमुना मुलांपैकी ३०% मुलांनी क्रियाविशेषण अव्ययाचा प्रकार बरोबर ओळखला तर २०% मुलांनी क्रियाविशेषण अव्ययाचा प्रकार चुकीचा ओळखला. त्याचप्रमाणे एकूण नमुना मुलींपैकी ३१% मुलींनी क्रियाविशेषण अव्ययाचा प्रकार बरोबर ओळखला तर १९% मुलींनी क्रियाविशेषण अव्ययाचा प्रकार चुकीचा ओळखल्याचे दिसून आले.

१३) मराठी विषयातील शब्दाचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा असा प्रश्न विचारण्यात आला असता एकूण नमुना मुलां व मुलींपैकी प्रत्येकी ३४.५०% मुलां व मुलींनी शब्दाचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग बरोबर केला तर प्रत्येकी १५.५०% मुलां व मुलींनी शब्दाचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग चुकीचा केल्याचे दिसून आले.

१४) गणित विषयात प्राप्तांकाची सरासरी काढा असा प्रश्न विचारण्यात आला असता एकूण नमुना मुलांपैकी २६% मुलांनी प्राप्तांकाची सरासरी बरोबर काढली तर २४% मुलांनी प्राप्तांची सरासरी चुकीची काढली. त्याचप्रमाणे एकूण नमुना मुलींपैकी २९.७५% मुलींनी प्राप्तांकाची सरासरी बरोबर काढली तर २०.२५% मुलींनी प्राप्तांची सरासरी चुकीची काढल्याचे दिसून आले.

१५) मराठवाडा विभागाच्या एकूण नमुना शाळेतील गणित विषयासंदर्भात संख्येचा वर्ग काढा याविषयी विद्यार्थी मूल्यमापनात असे आढळून आले की, एकूण नमुना मुलांपैकी सरासरी ३७.७५% मुलांनी संख्येचा वर्ग बरोबर काढला तर सरासरी ६२.२५% मुलांनी संख्येचा वर्ग चुकीचा काढला. त्याचप्रमाणे एकूण नमुना मुलींपैकी सरासरी ३६.७५% मुलींनी संख्येचा वर्ग बरोबर काढला तर सरासरी ६३.२५% मुलींनी संख्येचा वर्ग चुकीचा काढल्याचे दिसून आले.

१६) मराठवाडा विभागाच्या एकूण नमुना शाळेतील इंग्रजी विषयातील वाचन क्षमतेसंदर्भात विद्यार्थी मूल्यमापनात असे आढळून आले की, एकूण नमुना विद्यार्थ्यांपैकी ९१ (२२.७५%) मुलांना व १११ (२७.७५%) मुलींना स्पष्ट वाचता येते; त्याचप्रमाणे ५७ (१४.२५%) मुलांना व ४१ (१०.२५%) मुलींना अस्पष्ट/अडखळत वाचता येते. तसेच ५२ (१३.००%) मुलांना व ४८ (१२.००%) मुलींना एक-एक शब्द देखील वाचता येत नसल्याचे दिसून आले. यावरुन असे स्पष्ट होते की, मराठवाडा विभागातील एकूण नमुना प्राथमिक शाळातील एकूण नमुना विद्यार्थ्यांपैकी २५% विद्यार्थ्यांना इंग्रजी वाचता येत नसल्याचे दिसून आले.

१७) इंग्रजी विषयातील शब्दाचा तक्ता पूर्ण करत असतांना एकूण नमुना मुलांपैकी ९.७५% मुलांनी तक्ता बरोबर पूर्ण केला तर ४०.२५% मुलांनी शब्दाचा तक्ता चुकीचा पूर्ण केला. त्याचप्रमाणे एकूण नमुना मुलींपैकी ७.५% मुलींनी शब्दाचा तक्ता बरोबर पूर्ण केला तर ४२.५% मुलींनी शब्दाचा तक्ता चुकीचा पूर्ण केला असल्याचे दिसून आले.

**शिफारशी :-**

१) प्राथमिक शिक्षणात मुला-मुलींच्या पटनोंदणी फरक असल्याचे दिसून येते. मुलांच्या तुलनेत मुलींचे पटनोंदणीचे प्रमाण काही शाळेत कमी असल्याचे दिसून आले. त्यामुळे शाळा सुरु होण्यापूर्वी दरवर्षी शाळेमार्फत प्रवेश पंधरवडा, प्रवेश दिंडी, गृहभेटीमुळे मुलींच्या पटनोंदणीचा प्रश्न सोडविता येईल.

२) प्राथमिक शाळेत मुलांची उपस्थिती वाढविण्यासाठी शासन स्तरावरुन केले जाणारे प्रयत्न उल्लेखनीय असले तरी नियोजनातील प्रत्यक्ष अमलबजावणीत उणीवा असल्यामुळे मुलांची उपस्थिती टिकून राहत नसल्याचे दिसते त्यासाठी मुलांना मोफत गणवेश, पुस्तके, शालेय पोषण आहार, उपस्थिती भत्ता या योजना संदर्भात पालकात जागृती करण्यासाठी पालक मेळावा, मिना-राजु मंच यांचे आयोजन प्रत्येक शाळेने करणे गरजेचे आहे.

३) प्राथमिक शिक्षणाच्या सुविधा सर्वदूर उपलब्ध झाल्या असल्यातरी आज ही ६ ते १४ वयोगटातील मुले शालेय शिक्षणापासून वंचित असल्याचे दिसून येते. वंचितांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी जाणीवपूर्वक पालकांचे शिक्षणासंदर्भात उद्‌बोधन व प्रसार माध्यमाद्वारे शिक्षणाचे महत्व पटवून देण्यात यावे.

४) सर्व शिक्षा अभियानामुळे प्राथमिक शाळेच्या पायाभूत सुविधांचा विकास झालेला असला तरी मराठवाडा विभागातील काही नमुना शाळेत स्वच्छतागृह, क्रिडांगण, पिण्याचे पाणी, ग्रंथालय व



262